# साय-फाय करंडक चे नागराज मंजुळेंच्या हस्ते उद्घाटन

**पुणे । प्रतिनिधी**

क्विक हील फाऊंडेशनने सायबर सुरक्षा जागृती निर्माण करण्यासाठी पुणे-सायबर पोलिसांच्या सहकार्याने आज साय-फाय करंडक या पहिल्याच एकांकिकां स्पर्धांच्या तीन दिवसीय अंतिम फेरीचे उद्घाटन केले. प्रख्यात चित्रपट निर्माते आणि पटकथालेखक श्री. नागराज मंजुळे यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी संजय काटकर, पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभाग (ईओडब्ल्यू) , सायबर क्राईम पोलिस उपायुक्त सुधीर हिरेमठ ,जेष्ठ अभिनेते विक्रम गोखले आणि एक्सप्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य उपस्थित होते.



साय-फाय करंडकासाठीच्या प्रवेश अर्जांना सप्टेंबर २०१७ पासून सुरूवात झाली. यात पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर या सहा केंद्रांचा समावेश होता. या स्पर्धेत १०० पेक्षा जास्त संघांची नोंदणी झाली असून दोन महिन्यांच्या कठोर निवड प्रक्रियेनंतर भरत नाट्यमंदिर येथे २२ ते २४ डिसेंबर रोजी होणाऱ्या ग्रँड फिनालेसाठी २० संघ पात्र ठरले आहेत. नामवंत चित्रपट व नाट्य कलावंत आलोक राजवडे आणि अश्विनी गिरी पुढील तीन दिवस अंतिम फेरीतील स्पर्धकांची परीक्षा करतील. प्रख्यात चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत २४ डिसेंबरला दुपारी ५ वाजता विजेत्यांची घोषणा आणि बक्षिस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

साय-फाय करंडक २०१७ हा आयटी सिक्युरिटी सोल्यूशनचे अग्रगण्य पुरवठादार क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडची सीएसआर शाखा क्विक हील फाऊंडेशनचा पुणे शहर पोलिसांच्या सहकार्याने घेतलेला उपक्रम असून एक्सप्रेशन लॅब आणि पंख एनजीओचे त्याला पाठबळ लाभले आहे.

या अनोख्या एकांकिका स्पर्धा महोत्सवाचा उद्देश मानवी जीवनावर डिजिटल क्रांतीचा प्रभाव दर्शविणारे एक सशक्त व्यासपीठ तयार करणे हा आहे. साय-फाय करंडक हा क्विक हील आणि पुणे शहर पोलिसांची व्हर्च्युअल वर्ल्ड नेटिझन्सच्या दृष्टीने सुरक्षित करण्याची कटिबद्धता दर्शवतो.